भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA R 261296

# स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या संबंधाने परवाना

## (Agreement of Lease)

**पार्टी नं. १** :- स्व.गोविंदराव पाटील शिक्षण महाविदयालय दारव्हा तर्फे कार्यकारी प्राचार्य,
श्री जयवंत बापुराव काळे, वय अं. ५२ वर्ष
रा. कोल्हे लेआउट, यवतमाळ ता.जि.यवतमाळ

**पार्टी नं. २** :- नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, रजि.नं.एफ-१५६२
तर्फे सचिव, श्रीमती माधुरीताई नानासाहेब पोले
वय अं. ५३ वर्ष, रा. दोनद, ता. कारंजा, जि. वाशिम

यात पार्टी नं. १ व २ संयुक्तरित्या स्थावर मालमत्तेच्या परवाना संबंधाने करारनामा करतात तो येणे प्रमाणे :-

१. या करारनाम्यात हे स्पष्ट करण्यात येत आहे की, करारनामा तयार करणारे पार्टी नं.१ व २ यापैकी पार्टी नं. १ ही शैक्षणीक संस्था असुन त्या संस्थेच्या वतीने कार्यकारी प्राचार्य म्हणुन यावर सही करण्यात आलेली आहे आणि पार्टी नं. २ ही विश्वस्त संस्था असुन, ती सोसायटी कायदया अंतर्गत सुधदा नोंदणीकृत आहे आणि त्याचे सचिव म्हणुन यावर सहया करण्यात येत आहे. परंतु हा करारनामा पार्टी नं. १ व २ यांच्या आजच्या पदाधिका-यांना व भविष्यात निर्माण होणा-या पदाधिका-यांना लागु व बंधनकारक राहील.

२. पार्टी नं. २ यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता दारव्हा खंड-१, तालुका दारव्हा जि. यवतमाळ नगर परिषद हद्दीबाहेरील शेत भुमापन क्रमांक १४०/२अ व १४०/२ब एकुण क्षेत्र ६ हे. ४७ पैकी पुर्व पश्चिम धुरा पाडुन दक्षिणेकडील १ हे. २१ आर जमीन ही दिनांक २९/११/२००६ रोजीच्या खरेदीखता प्रमाणे खरेदी केलेली आहे आणि या ठिकाणी पार्टी क्रमांक २ यांनी या ठिकाणी तळमजला, प्रथम मजला व व्दितीय मजला असे एकुण बांधकाम केलेले आहे. या बांधकामा करीता एकुण जागा १९५०० चौरस मिटरचा वापर करण्यात आलेला असुन ही प्लॉटची जागा आहे आणि त्यावर १८१०.४४ चौरस मिटर एवढे बांधकाम केलेले आहे. आणि या बांधकामा मध्ये एकुण २२ खोल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे व त्यामध्ये दोन मोठे हॉल सुध्दा आहे, पार्टी नं. २ हयांनी हे जे बांधकाम केलेले आहे हे शैक्षणीक संस्था चालविण्याच्या दृष्टीकोणातुन वर्ग खोल्याच्या प्रमाणे केलेले आहेत आणि हे बांधकाम व खाली प्लॉट ही संपुर्ण मालमत्ता या कराराचा विषय आहे.

३. पार्टी नं. २ यांच्या संस्थे तर्फे पार्टी नं. १ हे महाविदयालय चालविले जाते आणि पार्टी नं. २ हयांनी या मालमत्तेच्या संबंधाने कोणतेही भाडे आकारण्याचे ठरविलेले नाही. बिनाभाडयाने ही मालमत्ता पार्टी क्रमांक १ महाविदयालयाला परवानाधारक म्हणुन देण्यात आलेली आहे.

४. ही मालमत्ता पार्टी नं. २ हयांनी पार्टी नं. १ हयांना ३० वर्षाच्या मुदतीकरीता दिलेली असुन ही मालमत्ता सन २००८ पासुन पार्टी नं. १ यांच्या उपयोगात आहे आणि हा परवाना सन २०३८ पर्यंत शैक्षणीक सत्रा पर्यंत राहील. त्यानंतर पार्टी नं. १ व २ हयांच्या पदाधिका-या मार्फत जो निर्णय घेण्यात येईल त्या प्रमाणे या मालमत्तेच्या संबंधाने करारनामा केल्या जाईल. २०३८ पर्यंत हया मालमत्तेचा वापर परवानाधारक म्हणुन पार्टी नं. १ हयांना करण्यांचा पुर्ण अधिकार राहील.

५. या मालमत्तेचा वापर पार्टी नं. १ हयांनी योग्यरित्या करावा या मालमत्तेस नुकसान होईल अशी कोणतीही कृती त्यांनी करू नये. आणि

MNPole

पार्टी नं. २ च्या परवानगी शिवाय हा परवाना इतर कोणासही हस्तांतरीत करू नये.

करीता हा करारनामा (Agreement of lease) हा पार्टी क्रमांक १ व २ हयांनी साक्षदारा समक्ष आज दिनांक २६/ २/२०१६ रोजी यवतमाळ मुक्कामी केला असुन हा करारनामा पार्टी क्रमांक १ व २ संस्थेच्या वर्तमान पदाधिका-यांना व भविष्यातील पदाधिका-यांना लागु व बंधनकारक राहील.

यवतमाळ
साक्षदार -

१. ----------------
( प्रभाकर नारायण खोबडे )

२. ----------------
(अविनाश शेषराव शिंगार)

----------------
कार्यकारी प्राचार्य स्व.गोविंदराव पाटील शिक्षण महाविद्यालय दारव्हा
(पार्टी नं. १)

प्राचार्य
स्व. गोविंदराव पाटील शिक्षण महाविद्यालय
दारव्हा,जि.यवतमाळ

MNPole
----------------
सचिव,
नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ
दारव्हा ता. दारव्हा जि. यवतमाळ
(पार्टी नं. २)

अध्यक्ष/सचिव
नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ
दारव्हा,जि.यवतमाळ

The Signature of Sh... Tenant Bapurao Kute, Smt. ...
Who is Personally known to me Identified by ...
He has Sig... 26th Feb 2016
at Yavatmal is attested ... 247/16 Dt. 26.2.16
Notary
Adv. R. B. Badnore
26.2.16

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL
CANCELLED CANCELLED

NOTARY
Adv. R.B. Badnore
Yavatmal. Distt.
Regd. No. 990
GOVT OF MAHARASHTRA